महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

क्र.साप्रवि/रवका/न.क्र.३४८ /
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
*मुंबई - ४०० ०१९.*

## प्रशासकीय परिपत्रक क्र. २३६ दिनांक २१/०७/२००९

विषय : माहितीचा अधिकार अधिनियम २००५ ची कार्यवाही करण्यासंदर्भात सूचना.

संदर्भ : १) शासन परिपत्रक क्र. केमाअ-२००८/१२६४/प्र.क्र.४३७/०८/सहा, दि.१३/०५/०९
२) शासन परिपत्रक क्र. केमाअ-२००८/८७०/प्र.क्र.३००/०८/सहा, दि.१३/०५/०९

------

माहितीचा अधिकार अधिनियम - २००५ ची अंमलबजावणी कंपनीच्या सर्व कार्यालयात व्हावी या दृष्टीने त्याबाबतच्या सूचना वेळोवेळी निर्गमित करण्यात आल्या आहेत. याच संदर्भात संदर्भिय शासन परिपत्रकांच्या प्रती सोबत जोडण्यात येत आहेत.

२. सदर परिपत्रकात माहितीचा अधिकार अधिनियम - २००५ अंतर्गत शासनास पाठविण्यात येणारी माहिती अनावश्यकरित्या सामान्य प्रशासन विभागास पृष्ठांकित केली जात असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे मनुष्यबळ स्टेशनरी, कार्यालयीन वेळ व टपालखर्च इत्यादी संसाधनावर अनावश्यक ताण पडतो. त्याचप्रमाणे, अर्जदाराशी करण्यात येणाऱ्या पत्रव्यवहारावर कार्यालयाचा/ जन माहिती अधिकाऱ्याच्या पूर्ण पत्ता/दूरध्वनी क्रमांक/ उपलब्ध असल्यास फॅक्स क्रमांक/ ई-मेल आयडी इत्यादी बाबी नमूद केलेल्या नसल्याचेही शासनास निदर्शनास आले आहे.

३. सबब, सर्व संबंधितांनी विनंती करण्यात येते की संदर्भिय शासन परिपत्रकांचे अवलोकन करून माहितीचा अधिकार अधिनियम - २००५ ची अंमलबजावणी काटेकोरपणे होण्याच्या दृष्टीने सूचनांचे पालन करावे.

(सु.य.पाटील)
**मुख्य महाव्यवस्थापक (क)**

प्रत
महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे

*D:\O&M\Adm Cir - 348.doc*

C2033
2/6/2009
Date

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ बाबत प्राप्त होणा-या पत्रांच्या तसेच अहवालांच्या अनावश्यक प्रतींबाबत सूचना

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक-केमाअ २००८/२२६४/प्र.क्र.४३७/०८/सहा,
दिनांक -१३/५/२००९

परिपत्रक :

राज्यामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ दिनांक १२ ऑक्टोबर,२००५ अंमलात आला आहे. हा अधिनियम केंद्राचा असून या अधिनियमाच्या अंमलबजावणीचे समन्वयन/संनियंत्रण करण्याच्या दृष्टीने सर्व मंत्रालयीन विभागांकडून विविध नियतकालिक/प्रासंगिक अहवाल या विभागामार्फत मागविले जातात. सर्व क्षेत्रिय कार्यालयांनी विहित पध्दतीनुसार त्यांची माहिती संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाकडे पाठविणे व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी ती संकलित स्वरुपात या विभागास पाठविणे आवश्यक आहे. या व्यतिरिक्त, कलम-६ अंतर्गत सार्वजनिक प्राधिकरणाकडे प्राप्त होणारे अर्ज त्यांनी त्यांच्या स्तरावरच निकाली काढणे आवश्यक आहे. मात्र शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, ब-याच क्षेत्रिय कार्यालयांकडून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ बाबतचे विविध अहवाल व पत्रांच्या प्रती अनावश्यकरित्या सामान्य प्रशासन विभागास पृष्ठांकित केल्या जातात. त्यामुळे मनुष्यबळ, स्टेशनरी , कार्यालयीन वेळ तसेच टपाल खर्च इत्यादी उपलब्ध मर्यादित संसाधनांवर अनावश्यक ताण पडतो. त्याचप्रमाणे शासनाकडे अनावश्यकरीत्या प्राप्त होणा-या पत्रव्यवहारामुळे महत्वाच्या टपालाकडे दुर्लक्ष होऊ शकते.

सबब, या विभागामार्फत विनिर्दिष्टपणे मागविण्यात येणा-या अहवालांव्यतिरिक्त, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ बाबतचे अहवाल तसेच पत्रव्यवहाराच्या प्रती या विभागास अनावश्यकरित्या पाठविण्यात येणार नाहीत, याची सर्व क्षेत्रिय कार्यालयांनी दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(नं.म.शिंदे)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

**प्रत :-**

मा.राज्यपालांचे सचिव
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,

२०३८
२/६/२००९
प-२
९/६/२००९.

माहिती अधिकारासंदर्भात अर्जदारांशी केल्या जाणा-या पत्रव्यवहारावर कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक,फॅक्स क्रमांक व ई-मेल आयडी इ. नमूद करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन परिपत्रक-केमाअ २००८/८७०/प्र.क्र.३००/०८/सहा,**
**मंत्रालय,मुंबई-४०० ०३२,**
**दिनांक - १३/५/ २००९.**

परिपत्रक :

माहिती अधिकारासंदर्भात अर्जदारांशी केल्या जाणा-या पत्रव्यवहारावर कार्यालयाचा/जन माहिती अधिका-यांचा पूर्ण पत्ता/दूरध्वनी क्रमांक/उपलब्ध असल्यास, फॅक्स क्रमांक/ई-मेल आयडी इत्यादी बाबी नमूद केलेल्या नसल्याने अर्जदारांना अनेक अडचणी उद्भवतात असे निदर्शनास आले आहे. त्यामुळे सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी माहितीचा अधिकार व इतरही सर्वसाधारण बाबीसंदर्भात केल्या जाणा-या पत्रव्यवहारावर संबंधित कार्यालयाचा/जन माहिती अधिका-यांचा पूर्ण पत्ता/दूरध्वनी क्रमांक/ई-मेल आयडी इत्यादी बाबी नमूद करण्याची दक्षता घ्यावी, जेणेकरुन अर्जदारांना संबंधितांशी योग्य व जलद पध्दतीने संपर्क साधणे शक्य होईल तसेच अनावश्यक पत्रव्यवहार व उपलब्ध मर्यादित संसाधनांवर पडणारा ताण टाळण्याचेही सार्वजनिक प्राधिकरणांना शक्य होईल.

२. माहितीच्या अधिकारासंदर्भात देय असलेले शुल्क रोख रकमेच्या स्वरुपात/बँकेचा धनादेश किंवा मनिऑर्डरच्या स्वरुपात भरण्याबाबत अर्जदारांना सूचना देणा-या पत्रव्यवहारामध्ये सदर रक्कम अथवा मनिऑर्डर कोणाच्या नावे पाठवावी, चलनाव्दारे रक्कम भरावयाची असल्यास बँकेचा तपशिल व लेखाशिर्ष याचाही स्पष्ट उल्लेख सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी त्यांच्या पत्रव्यवहारामध्ये करण्याची दक्षता घ्यावी. या व्यतिरिक्त, पत्रव्यवहारातील भाषा सौजन्यपूर्वक तसेच अर्जदारांना मार्गदर्शक ठरेल अशीच ठेवण्याच्या अद्यारुत तत्वाचीही काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(नं.म.शिंदे)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत :-

मा.राज्यपालांचे सचिव
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव

Thorat/C:\Documents and Settings\DELL\My Documents\Circulars